FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** धुळे शहर
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0502 **Year (वर्ष):** 2026
Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 06/11/2026 21:52

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7
2	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7(a)
3	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	12

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार
Time Period (कालावधी):
Date From (दिनांक पासून): 06/11/2026
Date To (दिनांक पर्यंत): 06/11/2026
Time From (वेळेपासून): 10:27 बजे
Time To (वेळेपर्यंत): 14:43 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
Date (दिनांक): 06/11/2026 **Time (वेळ):** 21:41 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ):**
Entry No. (नोंद क्र.): 028
Date & Time (दिनांक आणि वेळ): 06/11/2026 21:41 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 05 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** अधिष्ठाता कक्षाबाहेरील लघुलेखक,भाऊसाहेब हिरे शासकिय वैद्यकिय ,धुळे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): यशवंत विश्वनाथ बोरसे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	लाचलुचपत प्रति विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	लाचलुचपत प्रति विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9527427065

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	सुदेश दामोदर मानकर			1. एस एनडीटी महाविद्यालयाजवळ,,प्लट नं 19, गायत्री नगर,धुळे,धुळे शहर, धुळे,महाराष्ट्र,भारत
2	श्रीराम शंकर पाटील			1. बि नं 5, रुम नं 20, म्हाडा , मोहाडी, ता जि धुळे,धुळे शहर, धुळे,महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत):

मी यशवंत विश्वनाथ बोरसे, वय 39 वर्षे,पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे
समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे एक वर्षापासुन कार्यरत आहे. दि.05.11.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना तक्रारदार संतोष भगवान देवरे यांनी आमचे कक्षात समक्ष हजर राहुन त्यांचेकडे धुळे येथील श्री भाऊसाहेब हिरे शासकिय वैद्यकिय महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांचे लघुलेखक मानकर हे लाचेची मागणी करीत असल्याचे सांगितल्याने आम्ही मा. प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, देवपुर धुळे यांना पत्र देवुन त्यांचेकडील दोन शासकिय कर्मचारी श्री. जय गजेंद्र शेलार, शिल्प निदेशक व श्री. विश्वजित बापुराव कोहरे, लिपीक यांना उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे अशी ओळख देवुन त्यांची ओळख करुन घेतली. तसेच कार्यालयात हजर असलेले तक्रारदार संतोष भगवान देवरे यांना पोकॉ. मकरंद पाटील व पोकॉ. रामदास बारेला व दोन्ही पंचांची ओळख करुन दिली.
त्यानंतर आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव संतोष भगवान देवरे, वय 43 वर्षे, पोहेकॉ. नेमणुक धुळे तालुका पोलीस स्टेशन, रा. पोलीस मुख्यालय, बि. नं. 5, रुम नं. 2, धुळे असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली. त्यानंतर त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांची तक्रार त्यांचे हस्ताक्षरात लिहुन दिली ती पुढील प्रमाणे "मी धुळे तालुका पोलीस स्टेशन येथे नेमणुकीस असुन मी दि.13.04.2026 रोजी पावेतो 15 दिवस अर्जित रजेवर असताना मला काविळ आजाराची लागण झाली होती. त्यामुळे मी औषधोपचार घेणेकरीता धुळे तालुका पोलीस स्टेशन येथुन दि.13.04.2026 रोजी सिकमेमो घेवुन खाजगी रुग्णालयात औषधोपचार घेतले. त्यानंतर माझी तब्येत ठिक झाल्याने मी दि.08.10.2026 रोजी मा. पोलीस अधीक्षक, धुळे यांचे समक्ष कर्तव्यावर हजर झालो होतो.
त्यानंतर मा. पोलीस अधीक्षक, धुळे यांनी माझी वैद्यकिय तपासणी होणेकरीता दि.09.10.2026 रोजी म. अध्यक्ष, स्थायी वैद्यकिय मंडळ, भाऊसाहेब हिरे वैद्यकिय महाविद्यालय, धुळे येथे पत्र दिल्याने तेथे माझी दि.21.10.2026 व दि.22.10.2026 रोजी वैद्यकिय तपासणी करण्यात आली होती. माझे वैद्यकिय तपासणीचे प्रमाणपत्र धुळे पोलीस अधीक्षक कार्यालयास प्राप्त न झाल्याने मी दि.02.11.2026 रोजी चौकशी करण्यासाठी हॉस्पीटल येथे गेलो. तेव्हा तेथे मला श्री मोरे नामक व्यक्ती भेटले, त्यांनी मला "तुम्हाला सकारात्मक वैद्यकिय प्रमाणपत्र देण्यासाठी डिन साहेबांचे स्टेनो मानकर यांना 15,000/- रुपये द्यावे लागतील, त्याशिवाय तुमचे वैद्यकिय प्रमाणपत्र तुमच्या कार्यालयात पाठविले जाणार नाही." असे सांगितले. तेव्हा मी माझेकडे असलेले 5,000/- रुपये त्यांना दिले व बाकी पैसे नंतर देतो असे सांगुन स्टेनो मानकर यांची भेट करुन दे असे सांगितले, तेव्हा त्यांनी "मी स्टेनो मानकर यांचेशी बोलतो, ते तुम्हाला फोन करतील तेव्हा तुम्ही त्यांना भेटुन 10,000/- रुपये द्या" असे सांगितले होते. त्यानंतर आज दि.05.11.2026 रोजी स्टेनो मानकर यांनी फोन करुन मला हॉस्पीटल मध्ये भेटण्यास बोलविले आहे. त्याप्रमाणे मी उदईक दि.06.11.2026 रोजी स्टेनो मानकर यांना भेटण्यास जाणार आहे. मला स्टेनो मानकर यांना लाच देण्याची मनापासुन इच्छा नाही. तसेच त्यांचेशी कोणताही आर्थिक व्यवहार अथवा वाद विवाद नाही.
मी उद्या दि.06.11.2026 रोजी धुळे श्री भाऊसाहेब हिरे शासकिय वैद्यकिय महाविद्यालयात स्टेनो मानकर यांना भेटण्यास जाणार आहे. तेव्हा त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर आपल्या विभागामार्फत कायदेशीर कारवाई करावी ही विनंती आहे" अशी लेखी तक्रार दिली. सदर तक्रारीवर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेशी चर्चा करुन तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची दि.06.11.2026 रोजी पडताळणी कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला.
त्यानंतर दि.06.11.2026 रोजी तक्रारदार व दोन्ही पंच ला.प्र.वि. धुळे कार्यालयात हजर झाले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना दि.05.11.2026 रोजी सायंकाळी खाजगी इसम मोरे यांचा फोन आला असुन त्यांनी आज रोजी त्यांना फोन करुन भेटण्यास येण्याबाबत सांगितले असल्याचे आम्हास सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांनी लघुलेखक मानकर व खाजगी इसम मोरे यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांची भेट घेवुन पडताळणी कार्यवाही करावयाची असल्याचे पंचांना सांगुन पडताळणी कार्यवाही बाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या.
त्यानंतर आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन खाजगी इसम मोरे यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार संतोष देवरे व पंच नं. 01 शेलार यांना रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच शेलार असे धुळे ला.प्र.वि. कार्यालयात परत आले. तेव्हा आम्ही पंच नं. 01 शेलार यांना विचारणा केली असता त्यांनी ते व तक्रारदार असे दुचाकीने रवाना झाले, तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन खाजगी इसम मोरे यांच्या मोबाईलवर फोन केला असता त्यांनी तक्रारदार यांना धुळे येथील बारा पत्थर चौकात येण्यास सांगितले. तेव्हा आम्ही धुळे शहरातील बारा पत्थर येथे गेलो. तेथे तक्रारदार यांनी खाजगी इसम मोरे यांची भेट घेतली. तेव्हा त्यांनी लघुलेखक मानकर यांचेकरीता तक्रारदार यांच्याकडे 15,000/- रुपये लाचेची मागणी करुन तक्रारदार यांनी अगोदर दिलेले 5,000/- रुपये सोडुन उर्वरीत 10,000/- रुपये घेवुन येण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी आता माझयाकडे पैसे नाहीत, दिवाळी नंतर पैसे देतो असे खाजगी इसम मोरे यांना सांगितले असता त्यांनी रिपोर्ट आजच पाठविणार आहेत, पैसे आजच द्यावे लागतील. तेव्हा तक्रारदार यांनी पैसे जमल्यावर कॉल करतो असे सांगितल्याची हकिगत सांगितली. दरम्यान तक्रारदार यांना त्यांच्या मोबाईलवर लघुलेखक मानकर यांचा फोन येत असल्याचे तक्रारदार यांनी आम्हास सांगितले. तेव्हा आम्ही त्यांना मोबाईलचा स्पिकर सुरु करुन फोनवर बोलण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी फोनवर दिवाळी असल्याने मला पैसे जमा करावे लागतील असे सांगुन मोरे यांनी दहा हजार करुन द्या असे सांगितले आहे. तेव्हा लघुलेखक मानकर यांनी थोडया वेळात तुम्ही भेटायला या असे तक्रारदार यांना सांगितले. त्यानंतर फोन बंद केला. त्यानंतर लघुलेखक मानकर यांनी तक्रारदार यांना पुन्हा फोन करुन भेटण्यास येण्यास सांगितले.
त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लघुलेखक मानकर यांची श्री भाऊसाहेब हिरे शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, धुळे येथे भेट घेण्यास पाठवुन पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा आम्ही, दोन्ही पंच, पोकॉ. मकरंद पाटील व पोकॉ. रामदास बारेला असे खाजगी कारने व तक्रारदार त्यांच्या दुचाकीने ला.प्र.वि. धुळे कार्यालयातुन रवाना होवुन सुरत बायपास रोडवर असलेल्या खान्देश कॅन्सर हॉस्पीटल जवळ पोहोचलो. तेथे आम्ही तक्रारदार व पंचांना पडताळणी बाबत पुन्हा थोडक्यात सुचना देवुन तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन तक्रारदार व पंच नं. 01 शेलार अशांना तक्रारदार यांच्या दुचाकीने धुळे श्री भाऊसाहेब हिरे शासकीय महाविद्यालयात लघुलेखक मानकर यांची भेट घेण्यासाठी रवाना केले.
काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. तेव्हा आम्ही पंच नं. 01 यांना आमचे पासुन रवाना केल्यापासुन ते परत येई पावेतोची हकिगत विचारली असता त्यांनी ते व तक्रारदार असे दुचाकीने वैद्यकिय महाविद्यालयात गेलो. तेथे तक्रारदार यांनी मानकर यांना फोन करुन आलो असल्याचे सांगितले. तेव्हा लघुलेखक मानकर यांनी तेथे जवळ असलेल्या टपरीवर येण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार व मी तेथील टपरीवर थांबलो. तेव्हा तेथे लघुलेखक मानकर आले, तेव्हा तक्रारदार व त्यांच्यात चर्चा झाली. चर्चे दरम्यान तक्रारदार यांनी ते मोरे नानांना भेटल्यावर त्यांनी पंधरा हजार रुपये मागणी केल्याचे सांगुन तक्रारदार यांनी काहीतरी कमी करुन टाका माझी परिस्थिती नाही असे लघुलेखक मानकर यांना सांगितले असता त्यांनी तक्रारदार यांना 10,000/- रुपये लगेच द्या, मी तुमचे सर्टीफिकेट पाठवुन देतो असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी मानकर यांना पैसे घेवुन येतो असे सांगितले. त्यानंतर आम्ही सर्व जण तेथुन रवाना होवुन ला.प्र.वि. धुळे कार्यालयात आलो. त्यानंतर आम्ही सापळा आयोजित करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा तक्रारदार यांनी 500/- रुपये दराच्या 20 नोटा, असे 10,000/- रुपये हजर केले. त्यानंतर सदर नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही, पंच नं. 2 विश्वजित कोहरे, पोहेकॉ. राजन कदम, पोकॉ. मकरंद पाटील व पोकॉ. रामदास बारेला असे खाजगी कारने व तक्रारदार व पंच नं. 1 शेलार असे तक्रारदार यांच्या दुचाकीने धुळे ला.प्र.वि. कार्यालयातुन रवाना होवुन सुरत बायपास रोडवरील खान्देश कॅन्सर हॉस्पीटल जवळ पोहोचलो. तेथे तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन तक्रारदार व पंच नं. 01 शेलार यांना दुचाकीने श्री भाऊसाहेब हिरे शासकिय वैद्यकिय महाविद्यालयात लघुलेखक मानकर यांची भेट

घेण्यासाठी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 02 कोहरे, पोहेकॉ. राजन कदम, पोकॉ. मकरंद पाटील व पोकॉ. रामदास बारेला असे खाजगी कारने तेथुन रवाना होवुन तक्रारदार यांच्या मागोमाग शासकिय वैद्यकिय महाविद्यालयाच्या आवारात जावुन परिसरात आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी डाव्या हाताने डोक्यावरुन हात फिरवुन ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा पंच नं. 01 शेलार यांनी सांगितल्याप्रमाणे लघुलेखक मानकर यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाच स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवुन घेतलेली 10,000/- रुपये लाचेची रक्कम आमचे सुचनेवरुन पंच नं. 02 विश्वजित कोहरे यांनी ताब्यात घेतली. त्यावेळी आमचे सुचनेवरुन पोहेकॉ. राजन कदम यांचे दोन्ही हात मनगटापासुन धरुन लघुलेखक मानकर यांना ताब्यात घेतले. त्यानंतर ला.प्र.वि, धुळे कार्यालयात येवुन तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
अशा प्रकारे तक्रारदार संतोष भगवान देवरे यांचे वैद्यकिय तपासणीचे प्रमाणपत्र मा. पोलीस अधीक्षक, धुळे कार्यालयास पाठविण्याकरीता खाजगी इसम श्रीराम शंकर पाटील उर्फ दादु मोरे यांनी तक्रारदार यांचेकडुन लघुलेखक सुदेश दामोदर मानकर यांचेकरीता 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन तक्रारदार यांना लाच देण्यास प्रोत्साहित केले. तसेच सुदेश दामोदर मानकर, लघुलेखक, श्री भाऊसाहेब हिरे शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, धुळे यांनी तक्रारदार यांच्याकडे 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम दि.06.11.2026 रोजी सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडून स्वत: स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7, 7-अ व 12 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Archna Supadu patil(I (Inspector)) / API **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): **No.**(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Archna Supadu patil
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): API

पोलीस ठाणे अंमलदार
धुळे शहर पोलीस स्टेशन

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**